**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ०३ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय.**
2. **विकसित शेतीशिवाय विकसित भारताचं स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही - केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचं प्रतिपादन.**
3. **कापणी झालेल्या पिकांच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी भरपाई देण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश.**
4. **आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अंतिम सामना रंगणार.**

**आता सविस्तर बातम्या .......**

अनुसूचित जमाती आयोग

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापन करण्यास तसेच आयोगासाठी पदनिर्मिती, जागा आणि अनुषंगिक खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. केंद्रीय स्तरावर देशात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्याकरिता दोन स्वतंत्र आयोग आहेत. या दोन्ही आयोगांशी निगडीत विषय वेगेवगळे आहेत. त्यामुळे दोन स्वतंत्र आयोग असणे आवश्यक आहे. तसेच ५१ व्या जनजाती सल्लागार परिषदेत महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार हा आयोग स्थापन करण्यात येत आहे. या आयोगाची रचना राज्य अनुसूचित जाती आयोगाप्रमाणेच एक अध्यक्ष आणि चार अशासकीय सदस्य अशी राहील. आयोगाकरिता नव्याने २६ पदे निर्माण करण्यात येणार आहेत. या पदांसाठीचे तसेच आयोगाचे सदस्य यांचे वेतन, भत्ते आणि कार्यालयासाठी भाडे तत्वावर जागा, फर्निचर, वीज, दूरध्वनी, इंधन यांसह अनुषंगिक खर्चासाठी ४ कोटी २० कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. दरम्यान, अनुसूचित जाती आयोग देखील स्वतंत्रपणे कार्यरत राहणार आहे. या दोन्ही आयोगांना घटनात्मक दर्जा मिळावा, यासाठी मंत्रिमंडळाने

तत्वतः मान्यता दिली. त्यासाठीही आगामी काळात कार्यवाही करण्यात येणार आहे.

संसदेचं विशेष सत्र

पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर संसदेचं विशेष सत्र बोलावण्याची मागणी इंडिया आघाडीने केली आहे. नवी दिल्ली इथं इंडिया आघाडीच्या घटक पक्षांची बैठक आज झाली, त्यात हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आघाडीच्या सोळा घटक पक्षांनी संसदेचं विशेष सत्र बोलावण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिल्याची माहिती काँग्रेस खासदार दीपेंदर सिंह हुड्डा यांनी बातमीदारांना दिली.

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान

विकसित शेतीशिवाय विकसित भारताचं स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही, असं केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. कृषीमंत्री आज पुणे दौऱ्यावर असून त्यांनी नारायणगांव इथल्या कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट दिली आणि शेतकऱ्यांशी संवाद साधला. कृषी क्षेत्रात होणारं संशोधन शेतकऱ्यांच्या आवाक्यात असावं, यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं सांगून बनावट बियाणं आणि खतांची विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

***हाँ, मैंने एक और फैसला किया है, मैं किसी को डराने के लिए नहीं कह रहा हूँ। कई जगह मुझे कहा कि कीटनाशक घटिया आते हैं, डालते हैं, परेशान हो जाते हैं तो हम एक कड़ा कानून बनाने वाले हैं कि अगर घटिया दवाई दी तो हम छोड़ेंगे नहीं। किसी भी किसान की लूट नहीं की जा सकती है। रेसेन्टअली मालूम पडा है, कि कानून बना हैं जीस पे हम काम कर रहे हैं।***

त्यानंतर त्यांनी पुण्याच्या कृषी महाविद्यालयाला भेट दिली आणि तिथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विकसित कृषी संकल्प अभियानाअंतर्गत सुरू असलेल्या कृषी हॅकेथॉन कार्यक्रमात सहभागी झाले. यावेळी त्यांच्या हस्ते कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्ती आणि संस्थांचा गौरव करण्यात आला. कृषी क्षेत्रासमोर नागरीकरण, औद्योगिकीकरण, पाण्याची कमतरता, मनुष्यबळाची कमतरता, वाढता उत्पादन खर्च ही आव्हानं आहेत. त्यामुळे किफायतशीर शेतीसाठी आवश्यक तंत्रज्ञान, उत्कृष्ट बियाणं पोहोचवण्याचा प्रयत्न सरकार करत असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी

म्हणाले. एआयचा वापर, पाणी व्यवस्थापन, खताचं व्यवस्थापन, शेती कचरा व्यवस्थापन आदी विषय या हॅकेथॉनमधे मांडण्यात आले. हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत नेण्याचं काम सगळ्यांना मिळून करायचं आहे, असंही पवार म्हणाले. चौहान यांच्या उपस्थितीत आज पुण्यातल्या बालेवाडी क्रीडा संकुलात प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांचा मेळावा तसंच महाआवास अभियानाचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळाही होणार आहे.

शिष्टमंडळ

दहशतवाद सीमा ओलांडून पसरला आहे. भारताने सुरू केलेल्या दहशतवाद विरोधी मोहिमेत आता जगभरातील सर्व देशांनी एकत्र येऊन लढण्याची वेळ आलीय, असे सडेतोड मत भारतीय खासदारांच्या शिष्टमंडळाचे नेते डॉ. श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केले. लायबेरिया प्रजासत्ताकच्या संसदेला संबोधित करताना शिंदे यांनी दहशतवादाविरोधातील भारताची भूमिका परखडपणे मांडली. या दौऱ्याच्या निमित्ताने सिएरा लिओन आणि लायबेरिया प्रजासत्ताक या पश्चिम आफ्रिकेतील दोन देशांच्या संसदेला संबोधित करण्याचा बहुमान मिळवणारे डॉ. श्रीकांत शिंदे हे एकमेव भारतीय खासदार ठरले आहेत.

भरपाई

राज्यातील विविध भागात नुकत्याच झालेल्या पावसामुळे कापणी केलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अशा प्रकारे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत विचार केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले. राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज सह्याद्री राज्य अतिथी गृह येथे झाली. या बैठकीच्या सुरुवातीला राज्यात पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला गेला. त्यावेळी विविध मंत्र्यांनी कापणी केलेल्या पिकांचं नुकसान झाल्याचा मुद्दा उपस्थित केला. मदत आणि पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांनी सादरीकरणाद्वारे राज्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची आणि मदतीची माहिती दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या २७ मे रोजी झालेल्या बैठकीत घरांच्या पडझडींच्या दुरुस्ती आणि पुनर्बांधणीकरिता तातडीने मदतीकरिता निधी द्यावा, अशा सूचना केल्या होत्या. त्यानुसार ४९ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. कोकण विभागास पाच कोटी, पुणे विभागास १२ कोटी, नाशिक विभागास पाच कोटी, छत्रपती संभाजी नगर विभागास १२ कोटी, अमरावती विभागास पाच कोटी

आणि नागपूर विभागास दहा कोटी असे एकूण ४९ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत, असं सेठी यांनी यावेळी सांगितले.

मंत्रिमंडळ निर्णय

छत्रपती संभाजीनगर येथे राज्य कामगार विमा योजनेच्या रूग्णालयासाठी १५ एकर जमीन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. शहरातील औद्योगिक विस्तार आणि वाढत्या कामगारवर्गाच्या आरोग्य गरजांचा विचार करून कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) चं २०० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. यासाठी मौजे करोडी इथली १५ एकर गायरान जमीन देण्यास आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. याशिवाय बिबवेवाडी (पुणे), अहिल्यानगर, सांगली, अमरावती, बल्लारपूर (चंद्रपूर), सिन्नर (नाशिक), बारामती(पुणे), सातारा आणि पनवेल (रायगड) येथील प्रस्तावित रुग्णालयांसाठीही शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यास बैठकीत तत्त्वतः मान्यता देण्यात आली.

मार्गदर्शक सूचना

राज्य सरकारनं कोविड-१९ च्या व्यवस्थापनासाठी नवीन मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सर्व आरोग्य सुविधांनी इन्फ्लूएंझा-सदृश आजार आणि श्वसनाची गंभीर समस्या असलेल्या ५ टक्के रुग्णांची तपासणी करावी, असे निर्देश दिले आहेत. आरोग्य विभागानं सर्व महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि जिल्हा प्रशासनांना हे निर्देश दिले आहेत. हातांची स्वच्छता, श्वसन संस्थेचं आरोग्य, खोकताना आणि शिंकताना तोंड आणि नाक झाकणं तसंच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेचं वर्तन याबाबत जनजागृती करणारे उपक्रम राबवण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, राज्यात सध्या कोविडचे ५०६ रुग्ण उपचार घेत आहेत.

वनपरिषद

महाराष्ट्र राज्य वन विभागाद्वारे वनक्षेत्रातील महिला या विषयावर चंद्रपूर वन प्रशासन विकास आणि व्यवस्थापन प्रबोधिनी इथं येत्या ५ आणि ६ जून रोजी 'वनशक्ती २०२५'या वनक्षेत्रातील महिलांच्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय परिषदेमध्ये देशाच्या विविध भागांमधील वन क्षेत्रात कार्यरत महिला चर्चासत्रात उपस्थिती दर्शविणार आहेत. ५ जून रोजी सकाळी १०.३० वाजता वन मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होईल. उद्घाटनानंतर दुपारच्या सत्रात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेमध्ये श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी बोटॅनिकल गार्डन, विसापूर आणि

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला भेट देण्यात येणार आहे. इथं गट चर्चा, सादरीकरण तसेच वन्यजीव व्यवस्थापन आणि वन्यजीव संवर्धनात महिलांची भूमिका समजून घेतली जाणार आहे. या चर्चासत्रांचे उद्दिष्ट महिलांच्या वनक्षेत्रातील अनुभवांची देवाणघेवाण, नेतृत्वातील अडचणींची चर्चा, आणि वनक्षेत्रात महिलांच्या सहभागासाठी धोरणात्मक मार्गदर्शन तयार करणे हे आहे. प्रत्येक चर्चासत्रामध्ये की नोट भाषणे, पॅनेल चर्चा, आणि अनुभव शेअरिंग सत्रे आयोजित केली जातील. चंद्रपूर वन अकादमीमध्ये होणार असलेल्या या दोन दिवसीय परिषदेमध्ये सहभागी होण्यासाठी विदर्भ तसेच संपूर्ण राज्यातील महिलांनी मोठ्या संख्येत उपस्थित रहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक शोमिता बिस्वास यांनी केले आहे.

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर अंतिम सामना होणार आहे. संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. २००८ पासून सुरू झालेल्या आयपीएल स्पर्धेत आजतागायत या दोन्ही संघांकडे विजेतेपद आलेलं नाही. त्यामुळे दोन्ही संघांसाठी आजचा सामना महत्त्वाचा आहे.

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्रानं दिलेल्या माहितीनुसार आज संपूर्ण विदर्भात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. विदर्भात आज चंद्रपूर इथे ३९ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस इतक्या सर्वोच्च तापमानाची नोंद झाली. नागपूर इथे ३७ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आलं. उद्या नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

****